# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ आयुक्त / २० /2026-27 दि. 13/05/2026

**आदेश**

**विषयः-** मा. महासभेसाठी मुदतीत गोषवारा सादर करणेबाबत.

महापालिकेच्या कामाकाजासंबंधित लोकहितार्थ विकासकामे/धेय धोरणे ठरविण्यासाठी विभागाकडून आयुक्तांच्या मान्येतेने, मा. महासभेच्या अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येतात. त्यानुसार महासभेची विषय पत्रिका तयार करण्यात येते. सदस्यांना विषयाची माहिती होण्यासाठी/अभ्यास करण्यासाठी विषय पत्रिकेसोबत विभागाचा गोषवारा देणे अपेक्षित आहे, जेणे करुन त्यावर महासभेत उहापोह करुन निर्णय घेणे सुलभ होते.

परंतु, विभागाकडून महासभेच्या दिवसापर्यंत आयुक्तांच्या मान्यतेसाठी गोषवारा सादर करण्यात येतो. अतितात्काळ असल्याने आयुक्तांना गोषवाराच्या प्रस्तावांवर अभ्यासपूर्वक निर्णय घेणे कठीण जाते.

पर्यायाने, मनपा सचिवांकडे गोषवारा प्राप्त न झाल्यामुळे महासभा विषय पत्रिकेसोबत गोषवारा देण्यात येत नाही. याकारणे महासभेत सदस्यांकडून नाराजी व्यक्त करण्यात येते. ही बाब, कार्यालयीन कामकाजास अनुसरुन नाही.

सबब, या आदेशाव्दारे आपणांस सुचित करण्यात येते की, सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांनी तातडीचे प्रकरण वगळता आयुक्तांच्या मान्यतेसाठी किमान 15 दिवस आधी गोषवारा सादर करावा. जेणेकरुन मनपा सचिवाना वेळेत महासभा विषय पत्रिकेसोबत गोषवारा जोडून देणे सुलभ होईल.

सदर आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी. अन्यथा संबंधित विभाग प्रमुख/खाते प्रमुख कार्यवाही पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

Sharma

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत :**
विभाग प्रमुख/खाते प्रमुख (सर्व)

**प्रत,**
1) मनपा सचिव
2) मा. महापौर यांचे स्वीय सहाय्यक